**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**शनिवार दिनांक २५ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

**1. एनपीएस आणि युपीएस अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांनाही खासगी प्रमाणे शेअर बाजारात अधिक गुंतवणुकीचा मार्ग खुला**

**2. भविष्यातील राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा आपल्याला आपल्या इतिहासातून मिळते - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं शिव वैभव किल्ले स्पर्धे प्रसंगी प्रतिपादन**

**3. ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारताचा ९ गडी राखून विजय**

**4. आगामी ५ दिवस नागपूरसह विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट**

---

**एनपीएस**

एनपीएस अर्थात राष्ट्रीय पेन्शन योजना आणि युपीएस अर्थात युनिफाइड पेन्शन योजनेतल्या सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनाही आता LC 75 अर्थात Life Cycle 75 आणि BLC अर्थात BalancedLifeCycle या पर्यायांचा अवलंब करता येणार आहे. आतापर्यंत केवळ खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना या सुविधा उपलब्ध होत्या. LC75 मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना ७५ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक शेअर बाजारात करतायेईल. ३५ ते ५५ या वयोगटात शेअर बाजारातल्या गुंतवणुकीचं प्रमाण कमी होऊन सरकारी आणि खासगी रोख्यातल्या गुंतवणुकीचं प्रमाण वाढेल.BLC मध्ये ४५ वर्षापर्यंत किमान ५० टक्के रक्कम शेअर बाजारात गुंतवता येईल. त्यानंतर तिचं प्रमाण कमी होईल आणि रोख्यांमधली गुंतवणूक वाढेल. हे नवे पर्याय खुले झाल्यानं सरकारी कर्मचाऱ्यांना युपीएस आणि एनपीएसमधल्या गुंतवणुकीसाठी अधिकाधिक मार्ग उपलब्ध होतील, शेअर बाजारातली गुंतवणूक वाढवण्याचा पर्याय असल्यानं त्यांना अधिक परतावा मिळवता येईल.

---

**छट पूजा**

छट पूजेच्या महापर्वानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरासह जगभरातल्या भाविकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या पूजेचं सांस्कृतिक महत्व दिवसेंदिवस वाढत असून हा उत्सव साधेपणा आणि संयमाचं प्रतीक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज

माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. आजपासून सुरु होणाऱ्या छट पूजा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे मंत्रालयानं सहा हजारांहून अधिक विशेष रेल्वे गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासून नऊशे पेक्षा अधिक गाड्या धावतील, असं मंत्रालयानं सांगितलं आहे.

---------------------------------------------------

**जीएसटी**

केंद्र सरकारने अनेक वस्तूंवर GST कमी केलेला आहे. त्यातल्या त्यात ऑटोमोबाईल सेक्टर ज्यात दुचाकी आणि चारचाकी मध्ये GST कमी केल्यामुळे सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असलेल्या वस्तू खरेदी करणे,आता सोपे झालेले आहे. केंद्र सरकारने ऑटोमोबाईल सेक्टर मध्ये GST कमी केल्यामुळे ऑटोमोबाइल्स सेक्टरला बुस्ट मिळालेला आहे. सेवा ऑटोमोबाईलच्या पंकज जेठाणी यांनी आकाशवाणीसोबत संवाद साधला -

***(होल्ड बाईट - पंकज जेठाणी - ३८ सेकंद)***

***भारत सरकारने जीएसटीचा जे रिडक्शन केला आहे हा खूप छान आहे आणि स्पेशली ऑटोमोबाईल सेक्टरला हा खूप बूस्ट देत आहे किंवा भविष्यामध्ये पण देणारच आता दिवाळीमध्ये पण आम्ही चांगली कस्टमर आमच्या डीलरशीप ला विज़िट केले ते फोर व्हीलरसाठी इच्छित आहे ते फोर व्हीलर पर्चेस करत आहे आणि येणाऱ्या भविष्यात पण हे ऑटोमोबाईल सेक्टरला खूप बूस्ट देणार आहे आता जी लोकं टू व्हीलर बघते टू व्हीलर घेत होते आता ते हिंमत करून फोर व्हीलर वर कन्वर्ट होत आहे कारण की आता हि जीएसटी रिडक्शन आल्यामुळे गाड्यांची किंमत कमीत कमी एक लाख रुपये,पन्नास हजार रुपये आहेत किंवा जास्ती पण फरक पडलेला आहे.***

---------------------------------------------------

**‘मन की बात’**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२७ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूज-ऑन-एअर मोबाईल ॲप वर कार्यक्रम प्रसारित केला जाईल. तसंच एअर-न्यूज, डीडी न्यूज, पीएमओ आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वर कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

---------------------------------------------------

**शिव वैभव किल्ले स्पर्धा**

आपला इतिहास, संस्कृती आणि परंपरा हीच आपली खरी प्रेरणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन, नेतृत्व आणि कर्तृत्व हे भविष्यातल्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. लहान मुलांमध्ये हे मूल्य रुजावे आणि प्रत्येक घरातून शिवाजी महाराजांचा आदर्श पोहोचावा, हा या स्पर्धेचा मुख्य हेतू आहे," असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री गडकरी यांनी केलं -

***(होल्ड बाईट : केंद्रीय मंत्री नितीन  गडकरी - २० सेकंद)***

***आपला इतिहास आपली संस्कृती आपली विरासत ही आपली प्रेरणा आहे आणि भविष्यातल्या राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा आपल्याला इतिहासातून मिळते. त्यामुळे भूतकाळातला जो इतिहास आहे ज्याचा वर्तमान काळामध्ये अध्ययन आणि  चिंतन जर केलं तर भविष्यकाळात  राष्ट्राचा भविष्यातला वेध घेण्याकरता तो इतिहास आपल्याला प्रेरणा देते.***

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांच्या ऐतिहासिक वारसा त्यांचे शौर्य आणि सांस्कृतिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे शिव वैभव किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे उद्घाटन नागपुरातील सीताबर्डी येथील सेवा सदन शिक्षण  संस्थेच्या परिसरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच राजे मुधोजी भोसले व सेवा सदन शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा कांचन गडकरी उपस्थित होत्या. यावेळेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी किल्ल्यांची पाहणी देखील केली.

---------------------------------------------------

**दक्षता जनजागृती सप्ताह**

भ्रष्टाचार निर्मुलनासाठी जागरूकता निर्माण करण्याच्या हेतुनं दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ३१ ऑक्टोबर या जन्मदिनापासून ‘दक्षता जनजागृती सप्ताह’ साजरा केला जातो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यभर आयोजित होणाऱ्या या सप्ताहात विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. ‘दक्षता आपली सामायिक जबाबदारी’ अशी यंदाची संकल्पना आहे.

---------------------------------------------------

**भारत आणि ऑस्ट्रेलिया**

भारताचा सलामीचा फलंदाज रोहित शर्मा याच्या नाबाद 121 धावांच्या खेळीच्या भरवश्यावर तसंच विराट कोहली यांना त्याला दिलेली 74 धावांची महत्त्वपूर्ण साथ यामुळे भारतानं  ऑस्ट्रेलियाचा नऊ गडी राखून तसंच 69 चेंडू उर्वरित असताना दणदणीत पराभव केला. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज हेजलवुडन कर्णधार शुभमं गीलला

झेलबाद केलं. गिल शिवाय कुठल्याही भारतीय फलंदाजाला बाद करण्यात ऑस्ट्रेलियाचा संघ अपयशी ठरला भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात विजयासाठी भारताला २३७ धावांची गरज होती ती भारताने ३८व्या शतकात पूर्ण केली. सिडनीमध्ये झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. पण रेनशॉ वगळता त्यांच्या एकाही खेळाडूला अर्धशतकही करता आलं नाही. ४७ व्या षटकात त्यांचा पूर्ण संघ २३६ धावांवर बाद झाला. हर्षित राणा यानं ३९ धावांच्या मोबदल्यात त्यांचे ४ गडी टिपले

---------------------------------------------------

**चक्रधर स्वामीं**

नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या ३८ व्या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वज्ञ चक्रधर स्वामींनी दिलेल्या समतेच्या विचारसरणीचे महत्त्व अधोरेखित केले. रिद्धपूर तीर्थक्षेत्राने मराठी भाषा जीवंत ठेवली असून, तेथे स्थापन झालेलं मराठी भाषा विद्यापीठ जागतिक कीर्तीचं व्हावं यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. महानुभाव पंथाच्या समस्या सोडविण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं. या कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शिक्षण मंत्री दादा भुसे, खासदार भास्कर भगरे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

---------------------------------------------------

**हवामान**

येत्या 28 ऑक्टोबर पर्यंत नागपूर सह विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला असून यादरम्यान विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे

पुढील पाच दिवसांदरम्यान जिल्ह्यात तुरळक ते हलक्या पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी परिपक्व धान, सोयाबीन आदी पिकांची कापणी-मळणी तात्काळ पूर्ण करून पीक सुरक्षित ठिकाणी साठवावे, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. तसेच कापसाची वेचणी करून ते कोरड्या ठिकाणी साठवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. दरम्यान, येत्या काही तासात गडचिरोली, वर्धा, अमरावती, यवतमाळ, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह वादळ आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.तर नागपूर, अकोला, चंद्रपूर आणि वाशीम जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह वादळ आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गडचिरोली, येथे दुपारी ४ वाजता जोरदार पावसाने हजेरी लावली. यामध्ये एका दहावीच्या विद्यार्थ्याचा वीज पडून मृत्यू झाल्याचे आमच्या प्रतिनिधीने कळवल.

---

**एक गाव, एक वाचनालय**

गडचिरोली पोलीस दलाच्या ‘एक गाव, एक वाचनालय’ या उपक्रमांतर्गत वांगेतुरी इथं 73 व्या सार्वजनिक वाचनालयाचं उद्घाटन पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते पार पडलं . स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि अधिकारी यांच्या सहभागातून हे वाचनालय उभारण्यात आले असून, त्यात स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक ग्रंथ आणि अभ्यासिका सुविधा उपलब्ध आहेत. उद्घाटनापूर्वी विद्यार्थ्यांच्या सहभागाने ग्रंथदिंडी काढण्यात आली. 2023 पासून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत आतापर्यंत 73 वाचनालयं स्थापन झाली असून, 205 विद्यार्थी विविध शासकीय सेवांमध्ये रुजू झाले आहेत. जिल्हयातील सर्वांगीण विकासासाठी पोलीस दल कटिबद्ध असल्याचे अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

---